# डॉ पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ अकोला

## कृषी विज्ञान केंद्र,
## वाघापूर रोड, यवतमाळ- ४४५००१

दूरध्वनी क्र. (०७२३२) २४८२३५ email pckvkytl@yahoo.co.in

ICAR


---

जा.क्र./कृविके/यवत/शा.स.स.स./४७१/२०२१
दिनांक १५.१२.२०२१

प्रती

जिल्हा माहिती अधिकारो
जिल्हा माहिती कार्यालय, यवतमाळ

विषय : बातमी प्रसिद्ध  करणे बाबत...

महोदय :

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते कि  दि ०८-१२-२०२१ रोजी २१ व्या शास्त्रीय सल्लागार समितीची सभा संपन झाली .तरी याबाबत ची बातमी आपण विविध वृतमान पत्रातून प्रसिद्धी कराव हि विनंती

सोबत : सविस्तर बातमी व दोन फोटो

------स्वा--------
कार्यक्रम समन्वयक,
कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ

# कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ-१ (डॉ पं .दे.कृ.वि., अकोला ) आयोजित २१ वि शास्त्रीय सल्लागार समिती सभा संपन्न

## जिल्हयातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी व सेंद्रिय शेतीचे जिल्यामध्ये क्षेत्र वाढविण्याकरीता कार्य करावे तसेच विद्यापिठाने विकसीत केलेल्या विविध तंत्रज्ञानांचा जिल्हयामध्ये प्रचार व प्रसार करावे.— मा. डॉ. आर. एम. गाडे, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला तथा अध्यक्ष शास्त्रीय सल्लागार समिती सभा

यवतमाळ जिल्हयामध्ये कोवीड—19 चा प्रादुर्भाव लक्षात घेवुन शासनाच्या नियमावलीचे पालन करून कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ येथे दि. **08.12.2021** रोजी 21 व्या शास्त्रीय सल्लागार समितीची सभा सन्माननिय मा. डॉ. आर. एम. गाडे, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला तथा अध्यक्ष शास्त्रीय सल्लागार समिती सभा यांच्या अध्यक्षतेखाली व ऑनलाईन माध्यमातुन मा. डॉ. लखनसिंग, संचालक, अटारी, पुणे व मा. डॉ. एन. डी. पार्लावार, सहयोगी अधिष्ठाता, वसंतराव नाईक जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,.यवतमाळ, मा. डॉ. विजय माने, सहयोगी अधिष्ठाता, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ, मा. डॉ. प्रमोद यादगीरवार, सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवतमाळ तसेच ऑनलाईन माध्यमातुन मा. डॉ. राजेश टी, शास्त्रज्ञ, कृषि अर्थशास्त्र, अटारी, पुणे, डॉ. तुषार सर, अटारी, पुणे यांच्या प्रमुख उपस्थीतीत संपन्न झाली.

प्रास्ताविकपर सदस्य सचिव तथा कार्यक्रम समन्वयक, डॉ. सुरेश नेमाडे यांनी कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ यांनी सभेचे महत्त्व व उद्‌देश या विषयी माहिती देवुन कार्यालयाच्या अहवालाचे सादरीकरण व सन 2022—23 च्या कृती आराखडयाची माहिती दिली.

या प्रसंगी अतिथिपर मार्गदर्शनामध्ये मा. डॉ. आर. एम. गाडे, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांनी सर्व उपस्थित संलग्न विभागाचे अधिकारी व पदाधिकारी यांचे विद्यापिठाच्या वतीने स्वागत केले व याप्रसंगी कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व संलग्न विभाग यांनी एकत्र येवुन जिल्हयातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी व सेंद्रिय शेतीचे जिल्हयामध्ये क्षेत्र वाढविण्याकरीता कार्य करावे अशा सुचना देण्यात आल्या. तसेच विद्यापिठाने विकसीत केलेल्या विविध तंत्रज्ञानांचा जिल्हयामध्ये प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन केले व शास्त्रीय सल्लागार समिती सभेचे महत्व सांगुन जिल्हयातील मुख्य पिक कापूस, सोयाबिन, तुर, हरभरा, गहु ई. यावर सखोल चर्चा करण्यात आली.

ऑनलाईन प्रणालीवरून प्रमुख अतिथिपर मा. डॉ. लखनसिंग, संचालक, अटारी, पुणे यांनी शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीकरीता पिकांची फेरपालट करून, कृषि पुरक व्यवसाय करावे व त्याकरीता कृषि विज्ञान केंद्राने वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे होईल याची दखल घ्यावी. अशा सुचना दिल्या.

याप्रसंगी डॉ. प्रमोद मगर, विषय विशेषज्ञ, किटकशास्त्र, श्री. मयुर ढोले, विषय विशेषज्ञ, विस्तार शिक्षण, डॉ. सुकेशणी वाणे, विषय विशेषज्ञ, कृषि अभियंता, कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ यांनी विषयान्वये अहवालाचे सादरीकरण केले.

ऑनलाईन प्रणालीवरून मा. डॉ. राजेश टी, शास्त्रज्ञ, कृषि अर्थशास्त्र, मा. डॉ. तुषार, शास्त्रज्ञ, अटारी, पुणे अटारी, पुणे यांनी शेतकऱ्यांचे विकसित तंत्रज्ञानाचे ज्ञान व अवलंबन याविषयी कृषि विज्ञान केंद्राने अभ्यास करावा. या विषयी मनोगत व्यक्त केले.

मा. डॉ. विजय माने, सहयोगी अधिष्ठाता, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ यांनी शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग उभारणी करीता व तांत्रिक मार्गदर्शनाकरीता महाविद्यालयासोबत कार्य करावे. या विषयी चर्चा केली.

याप्रसंगी मा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विभाग, यवतमाळ यांचे प्रतिनिधी श्री. अनिल राठी, तांत्रिक अधिकारी, मा. श्री. अशोक ठाकरे, जिल्हा व्यवस्थापक, महाबीज, यवतमाळ, मा. श्री. राजेंद्र पा. फाळके, जिल्हा मृदचाचणी मृद सर्वेक्षण अधिकारी, यवतमाळ, मा. डॉ. सुनिल निळकंठ रोकडे, प्रमुख शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र–1, नागपूर, मा. श्री. प्रितम प्र. हस्ते, जिल्हा व्यवस्थापक, उमेद, यवतमाळ, मा. श्री. अजय मेसरे, प्रतिनिधी, मत्स्यव्यवसाय विभाग, यवतमाळ, मा. डॉ. नंदकिशोर हिरवे, प्रमुख, कृ वि के, सांगवी (रेल्वे) ता. दारव्हा, मा. श्री. विकास गर्जे, प्रगतशील शेतकरी, बाभुळगाव, मा. श्रीमती साधनाताई सराड, प्रगतशील महिला शेतकरी, सारफळी, ता. बाभुळगांव, मा. श्री. आशिषकुमार सातपुते, प्रसारण अधिकारी, आकाशवाणी केंद्र, यवतमाळ उपस्थित होते.

सभेचे संचालन श्री. मयुर ढोले, विषय विशेषज्ञ, विस्तार शिक्षण यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एस. एस. वाणे, विषय विशेषज्ञ, कृषि अभियांत्रिकी यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**............स्वा..............**
**कार्यक्रम समन्वयक**
**कृषि विज्ञान केंद्र,यवतमाळ**